**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**
**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – ५९८/२०२२/नंदुरबार**

१ श्री. अशोक मदन प्रकाशकर : अपिलार्थी
रा. १८, पटेलवाडी, कोरीटरोड, नंदुरबार,
ता.जि. नंदुरबार.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
वनक्षेत्रपाल,
वनक्षेत्रपाल नंदुरबार प्रादेशिक यांचे कार्यालय,
नंदुरबार, ता.जि. नंदुरबार.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, : प्रतिवादी
सहाय्यक वनसंरक्षक,
सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव) नंदुरबार
यांचे कार्यालय, पंचायत समिती समोर, नंदुरबार,
ता.जी. नंदुरबार.

**सुनावणी दिनांक – ०८/१२/२०२२**

अपिलार्थी यांनी दि. १६/१२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.०८/१२/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी, विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी

**सुनावणीसाठी अनुपस्थित-** तत्कालीन जन माहिती अधिकारी

अपिलार्थी यांनी दि. २३/०८/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये मग्रा रोहयो अंतर्गत वैदाणे, वाघाळे (सुतारे) येथे खाजगी शेतकरी यांचे शेतात सन २०१३ मध्ये केलेल्या प्रत्येकी १,२०,००० रोपांची रोपवाटीका सुरू करणे पुर्वी संबंधीत शेतकरी यांची ग्रामपंचायतीने केलेली निवड, सदर निवडीबाबत संबंधीत वन कर्मचारी यांनी क्षेत्रीय कार्यालयात सादर केलेला अहवाल, सदर अहवालासोबतची कागदपत्रे, झालेले करारनामे, सदर रोपवाटिकेस भेटी देणारे कर्मचारी यांचे वेळोवेळी सादर केलेले अहवाल, वरिष्ठांनी रोपवाटिकेस भेटीसमयी दिलेल्या लेखी सुचना व त्यांची नोंदवही सदर रोपवाटिकेस वेळोवेळी पुरविलेले साहित्य याच्या नोंदीचे रेकॉर्ड तयार रोपे वाटप, विक्रीची माहिती व रोपवाटिकेस भेटीसमयी काढलेले व ऑनलाईन केलेले फोटो व शिलकी साहित्याची माहिती व झालेली संपूर्ण कार्यवाही, रोपवाटिका

धारकांनी आपल्याकडे सादर केलेले अर्ज ही माहिती व झालेली संपुर्ण कार्यवाही, रोपवाटिका धारकांनी आपल्या कडे सादर केलेले अर्ज याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना विहीत मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसुन येत नाही.

तद्नंतर कोणतेही उत्तर न मिळाल्याने अपिलार्थी यांनी दि.२७/०९/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि. २०/१०/२०२१ रोजी, निर्णय पारित करुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती १० दिवसात विनामुल्य पुरविण्याचे निर्देश देवुन प्रथम अपिल निकाली काढले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविली नाही. तसेच सदर माहिती ही विस्तृत स्वरुपाची असुन वनक्षेत्र नंदुरबार (प्रा.) कार्यालयात गेल्या दोन तीन वर्षापासून लिपीक हे पद रिक्त आहे. त्यामुळे या कार्यालयाशी संबंधीत महत्वाची माहिती तसेच माहितीच्या अधिकार अधिनियम अंतर्गत माहिती अपिलार्थीस अथवा अपिलार्थी यांना वेळेत/तुदतीत पुरविता येत नाही. सद्य स्थितीत सदरचे पद रिक्तच असून माहितीच्या अधिकार अंतर्गत माहिती संकलित करुन अपिलार्थीस यांना पुरविणे करिता पुरेसे मनुष्यबळ या कार्यालयात उपलब्ध होऊ शकत नसल्याने माहिती देण्यास विलंब झाला आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २३/०८/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांना अपुर्ण माहिती प्राप्त झालेली आहे. त्यामुळे आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती मुद्दे निहाय पुरविणे योग्य होईल. तसेच जी माहिती पुरविता येत नाही त्याबाबत स्पष्ट कारण देणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल नंदुरबार प्रादेशिक यांचे कार्यालय, नंदुरबार श्रीमती व्ही. एन. चव्हाण यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस

त्यांच्या दिनांक २३/०८/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध मुद्येनिहाय माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती पुरविता येत नाही त्याबाबत स्पष्ट कारणे देखील कळविण्यात यावीत.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल नंदुरबार प्रादेशिक यांचे कार्यालय, नंदुरबार, श्री. प्रशांत हुमणे यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ५९८/२०२२/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) उप वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव), नंदुरबार यांचे कार्यालय, पंचायत समिती समोर, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री. प्रशांत हुमणे (तत्कालीन जन माहिती अधिकारी) वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल नंदुरबार (रोहयो) यांचे कार्यालय, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार. (सद्या कार्यरत वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण विभाग नागपूर (कामठी))

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./५९८/२०२२/नंदुरबार ओ-** 238 **दिनांक-** 22/02/2023